# शहर परिसरात विविध उपक्रमांनी प्रजासत्ताक दिन साजरा

## ध्वजारोहणासह गुणदर्शन कार्यक्रम, देशभक्तीपर गीते, गुणवंतांच्या सत्कारांचे आयोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शहर परिसरात ७० वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ध्वजारोहणासह विविध गुणदर्शन कार्यक्रम, देशभक्तीपर गीते, गुणवंतांचा सत्कार रक्तदान शिबिर आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

**शिवाजी विद्यापीठ**

शिवाजी विद्यापीठात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, डॉ. भारती पाटील, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. ए. एम. गुरव आदी उपस्थित होते.

**खादी ग्रामोद्योग संघ**

जिल्हा खादी व ग्रामोद्योग संघ स्वातंत्र्य सैनिक संघटना, सर्वोदय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. ज्येष्ठ नेते दादासाहेब जगताप यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य व्ही. डी. माने होते. स्वागत कोषाध्यक्ष सदाशिव मनुगडे यांनी केले. यावेळी संघाचे अध्यक्ष सुंदरराव देसाई, आबा कांबळे, ॲड. उदय पाटील, सविता देसाई, जी. बी. नलवडे आदी उपस्थित होते.

**फेरीवाला संघटना**

शहर जिल्हा काँग्रेस असंघटित कामगार फेरीवाला यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात शहर महिला काँग्रेस अध्यक्षा संध्या घोटणे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी वैशाली महाडिक, महंमदशरीफ शेख, तानाजी पाटील, शमशुद्दीन गवंडी, अल्मतीन शेख, प्रकाश गुरव, चंद्रकांत मुळे, बाबासाहेब गवंडी, अजिज गवंडी, युवराज मोरस्कर, रियाज गवंडी आदी उपस्थित होते.

**विवेकानंद महाविद्यालय**

श्री स्वामी शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते विवेकानंद महाविद्यालयात ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्रा. किरण पाटील, सुनीता भोसले, प्रा. संतोष कुंडले, प्रा. श्रीमती शहिदा कच्छी, सी. बी. दोडमणी, रवी चौगुले आदींसह संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

**ताराराणी विद्यापीठ**

ताराराणी विद्यापीठात प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्राजक्त पाटील, एस. एन. पवार, प्रा. डॉ. भारती शेळके, सौ. जे. एस. पाटील आदी उपस्थित होते.

**बाजार समिती**

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीत सभापती बाबासो लाड यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी उपसभापती संगीता पाटील, संचालक बाबुराव खोत, सचिव मोहन सालपे, राजेंद्र मंडलिक, नानासो पाटील, कर्मचारी, व्यापारी, अडत दुकानदार, हमाल, तोलाईदार आदींची उपस्थिती होती.

**सदर बाजारात नेत्रचिकित्सा शिबिर**

सदर बाजार येथे व मंथन फौंडेशनमध्ये नगरसेविका स्मिता माने यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापालिकेतील ताराराणी आघाडीचे गटनेते सत्यजित कदम होते. फौंडेशनचे अध्यक्ष मारुती माने प्रमुख उपस्थित होते. सदर बाजार हौसिंग सोसायटी व भारत विकास परिषद यांच्या वतीने मोफत नेत्रचिकित्सा शिबिर घेण्यात आले. २६५ जणांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ७० जणांवर मोतिबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. सोसायटीचे चेअरमन परशुराम कांबळे, प्रकाश कांबळे, कांतू चौगुले आदी उपस्थित होते.

**गुरुकुल शिक्षण संस्था**

गुरुकुल शिक्षण संस्थेच्या कसबा बावडा, मेन रोड येथील मुख्य कार्यालयात संस्थेचे अध्यक्ष सुहास सोरटे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. उपाध्यक्षा सौ. आशा सोरटे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. कळे येथील बीसीए कॉलेजच्या प्राचार्या रोहिणी घाडगे, कृषी पदविका कॉलेजचे प्राचार्य श्रीहरी शिंदे, डेअरी मॅनेजमेंट पशुसंवर्धन डिप्लोमा कॉलेजचे प्रा. सूर्यभान पांढरे, प्रा. अमृत पाटील, सागर गायकवाड, रघुनाथ यादव उपस्थित होते.

**जठारवाडी ग्रामपंचायत**

ग्रामपंचायतसमोर सरपंच नंदकुमार खाडे यांच्या हस्ते तर प्राथमिक शाळेसमोरील ध्वजारोहण सदस्य शरद पाटील-शियेकर यांच्या हस्ते झाले. यावेळी सर्व ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी उपस्थित होते.

**भोईराज फिशरीज सोसायटी**

भोईराज फिशरीज को-ऑप सोसायटीत संस्थेचे संचालक गणपत नलवडे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी किसन काटकर, केरबा बागडी, नामदेव तिकोणे, सुनील घाग आदी उपस्थित होते.

**बाल संकुल**

जिल्हा परिविक्षा व अनुरक्षण संघटना बालकल्याण संकुल येथे किरण पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्था उपाध्यक्ष सुरेश शिपूरकर, मानद कार्यवाह पद्मजा तिवले, सहमानद कार्यवाह एस. एन. पाटील, श्रीमती अश्विनी गुजर, कांचन हेबाळकर, पद्मजा गोरे, पी. के. डवरी, द्रौपदी पाटील आदी उपस्थित होते.

### मेजर शिंदे कार्यालयातर्फे ध्वजारोहण

प्रजासत्ताक दिनी मेजर शिंदे यांच्या राजारामपुरी येथील कार्यालयीन इमारतीवर कोल्हापूर मिलिटरी स्टेशनचे कमांडर कर्नल आर. एस. लेहल यांच्या हस्ते व प्रवीणसिंह घाटगे यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी कर्नल लेहल म्हणाले, फक्त सैनिकच नव्हे तर प्रत्येक नागरिक जो आपली सर्व कर्तव्ये पार पाडतो तो या देशाचा खरा भक्त आहे. पुढील पिढीला कर्तव्यदक्ष करणे हीच आपली खरी देशभक्ती आहे. मेजर शिंदे व डॉ. सरोज शिंदे यांनी हा ध्वजारोहणाचा उपक्रम गेली बावीस वर्षे मोठ्या स्तरावर राबवल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

यावेळी सुरेखा कडवेकर यांना 'सनशाईन गुणवंत कामगार', मंगल धनवडे व प्रिया प्रधान यांना अनुक्रमे जननी गुणवंत कामगार व विशेष उल्लेखनीय पुरस्काराने गौरवण्यात आले. कार्यक्रमाला कर्नल माधव वेसवीकर, आनंद माने, विजय अगरवाल, अमोल कोरगावकर, सहायक आयुक्त संजय सरनाईक, डॉ. संदीप पाटील, रणजित शाह, सिद्धांत शिंदे, विणा सिन्हा, कविता घाटगे, विशाखा आपटे, सुशील चंदवाणी, बाबा जांभळे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JAN 2019
तरुण भारत

# विद्यापीठात आज पत्रकारिता विद्यार्थी काँग्रेस

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या वतीने २९ ते ३० जानेवारी दरम्यान पत्रकारितेच्या राज्यभरातील विद्यार्थ्यांसाठी 'राज्यस्तरीय पत्रकारिता विद्यार्थी काँग्रेस २०१९" चे आयोजन केले आहे. 'फेक न्यूज : मिसइन्फर्मेशन अँन्ड डिसइन्फर्मेशन" या विषयावर प्राध्यापक आणि विद्यार्थी संशोधन पेपर सादर करणार आहेत. विद्यापीठातील निलांबरी हॉल येथे ही काँग्रेस होणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे यंदा सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. या निमित्ताने वर्षभर विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. याचाच एक भाग म्हणून राज्यस्तरीय काँग्रेसचे आयोजन केले आहे. यासाठी माहिती तंत्रज्ञानातील तज्ज्ञ डॉ. राजेंद्र पारिजात, औरंगाबाद येथील एमजीएमच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या प्रमुख डॉ. रेखा शेळके, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. सुधीर भटकर, पुणे विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागातील सहाय्यक प्राध्यापक संजय तांबट, शहाजी लॉ कॉलेजमधील सहाय्यक प्राध्यापक डॉ. प्रवीण पाटील, समाज माध्यम तज्ज्ञ विनायक राजाध्यक्ष, ज्येष्ठ पत्रकार वसंत भोसले, राजेंद्र हुंजे, श्रेयस होले, विवेक वाघमोडे आदी मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

लोकमत

# विद्यापीठात आजपासून पत्रकारिता विद्यार्थी काँग्रेस

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या वतीने आज, मंगळवारपासून पत्रकारितेच्या राज्यभरातील विद्यार्थ्यांसाठी 'राज्यस्तरीय पत्रकारिता विद्यार्थी काँग्रेस'चे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठातील निलांबरी हॉल येथे ही काँग्रेस होणार असून, यासाठी राज्यातील विविध विद्यापीठ आणि महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे यंदा सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. या निमित्ताने वर्षभर विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. याचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय काँग्रेस आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये 'फेक न्यूज : मिस इन्फर्मेशन अँड डिस इन्फर्मेशन' ही मध्यवर्ती संकल्पना आहे. या विषयावर राज्यातील पत्रकारितेचे प्राध्यापक आणि विद्यार्थी संशोधन पेपर सादर करणार आहेत. यासाठी 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले, 'आयबीएन लोकमत'चे माजी वृत्त संपादक राजेंद्र हुंजे, माहिती तंत्रज्ञानातील तज्ज्ञ डॉ. राजेंद्र पारिजात, औरंगाबाद येथील एमजीएमच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या प्रमुख डॉ. रेखा शेळके, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागातील सहायक प्राध्यापक डॉ. सुधीर भटकर, पुणे विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागातील सहायक प्राध्यापक संजय तांबट, शहाजी लॉ कॉलेजमधील सहायक प्राध्यापक डॉ. प्रवीण पाटील, समाजमाध्यम तज्ज्ञ विनायक राजाध्यक्ष, नागपूर येथील 'लोकमत टाईम्स'चे ज्येष्ठ बातमीदार श्रेयस होले हे मार्गदर्शन करणार आहेत.

उद्या, बुधवारी या उपक्रमाचा समारोप होणार आहे. या उपक्रमात माजी विद्यार्थी, संशोधक आणि पत्रकारांनी सहभागी व्हावे, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

सकाळ

# ५५ वर्षांचे प्राणिसंग्रहालय आकर्षण

## प्राणिशास्त्र विभाग; खाऱ्या व गोड्या पाण्यातील दुर्मीळ आठ प्रकारच्या जीवांचे अवशेष

संदीप खांडेकर : सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २८ : देवमाशाचा मणका, गोरिलाची कवटी, तारामासा ते सनबर्ड यांचे अवशेष शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागात जपले गेले आहेत. ५५ वर्षांपूर्वी साकारलेल्या या प्राणिसंग्रहालयात आठ प्रकारच्या प्राण्यांच्या अवशेषांची मांडणी केली आहे. संग्रहालय शालेय विद्यार्थी, शिक्षक, पालक यांचे आकर्षणाचे केंद्र बनले आहे. विशेष म्हणजे, संग्रहालयात दुर्मीळ प्राण्यांचे अवशेष असल्याने ते विद्यापीठाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले आहे.**



प्राणिसंग्रहालय.

> या विभागातून अनेक कर्तृत्ववान विद्यार्थी घडले आहेत. विद्यापीठाच्या प्रशासकीय कामकाजात आपला ठसा उमटवताना त्यांनी संग्रहालयाकडे विशेष लक्ष दिले आहे. विभागासाठी मंजूर झालेल्या निधीतून संग्रहालयाची देखभाल चांगल्या प्रकारे केली जाते.
>
> - डॉ. व्ही. एस. मन्ने, विभागप्रमुख, प्राणिशास्त्र विभाग

> प्राणिशास्त्र शाखेबद्दल गोडी वाढविण्यास हे संग्रहालय उपयुक्त आहे. प्राणी जंगल व टी.व्ही.वर पाहता येतात. मात्र, त्यांच्या शारीरिक संरचनेचा अभ्यास करायचा असेल तर संग्रहालय महत्त्वाचे ठरते.
>
> - श्रद्धा बेलगुंपे, पीएच.डी. संशोधक विद्यार्थिनी, प्राणिशास्त्र विभाग.

पृष्ठवंशीय व अपृष्ठवंशीय प्राण्यांच्या अवशेषांची मांडणी संग्रहालयात केली आहे. खाऱ्या व गोड्या पाण्यातील प्राण्यांचाही त्यात समावेश आहे. संग्रहालय विभागाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असून घुबड, मोर, चिमणी, करकोचा, पोपट, भारद्वाज, किंगफिशर, सनबर्ड, रानकोंबडी हे पक्षी स्टफिंग करून संग्रहालयात ठेवले आहत. महाराष्ट्राचा राज्य प्राणी 'शेकरू' हाही संग्रहालयात पाहायला मिळतो. विद्यापीठाच्या आवारात सापांचे अस्तित्व दररोज आढळते. मात्र, बंद बाटलीत विषारी व बिनविषारी सापांच्या अनेक जाती ठेवल्या आहेत. खवल्या मांजर, घोडा व मगरीची कवटी, माशांचे सापळे, समुद्राच्या तळाशी असणारे स्पाँज, गार्गोनिया, हायलोनिमा, फिंगर स्पांज, सी ॲनीमून यांच्यासह जिवाश्म किंग क्रॅब संग्रहालयाची शोभा वाढवणारे आहे.

शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर दोन-तीन महिन्यांत शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह संशोधक विद्यार्थी व पालक प्राणिसंग्रहालयास भेट देण्यास सुरुवात करतात. त्यांना विभागातील प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी प्राण्यांच्या अवशेषांची माहिती देतात. प्राण्यांसंदर्भात संशोधन करणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांसाठी हे संग्रहालय आधार ठरले आहे. नॅककडून संग्रहालयाचे कौतुक झाले आहे.

लोकमत

# विद्यापीठात उद्या 'विथ लव फ्रॉम रशिया' कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'विथ लव फ्रॉम रशिया' हा सांस्कृतिक कार्यक्रम उद्या, बुधवारी सायं. ५.०० वाजता वि. स. खांडेकर, भाषा भवन येथे आहे. याअंतर्गत मिनिस्ट्री ऑफ फॉरेन अफेअर्स, मॉस्को, रशियन फेडरेशन या शाळेतील शिक्षक चुबारोवा तत्याना, नतालिया बुरत्सेवा, पलिना बुदीर्ना, इरिना चिस्पालवा यांच्यासमवेत काही विद्यार्थी विदेशी भाषा विभागास भेट देणार असून, या विद्यार्थ्यांतर्फे पारंपरिक रशियन नृत्य सादर करण्यात येणार आहे. परदेशी शिक्षक विद्यापीठातील विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. विदेशी भाषांमध्ये उपलब्ध असणाऱ्या शिक्षण, रोजगार संधी व पर्यटनाची माहिती देण्यात येईल. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून, त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेधा पानसरे यांनी केले आहे.

Hello Kolhapur
Page No. 8 Jan 29, 2019
Powered by: erelego.com

# विद्यापीठात प्रजासत्ताक दिन उत्साहात

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठात प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते शनिवारी सकाळी ८ वाजता ध्वजवंदन करण्यात आले.

कुलगुरूंसह मान्यवरांच्या हस्ते विद्यापीठ प्रांगणातील शिवपुतळ्यास अभिवादन करण्यात आले. त्यांनी सर्व उपस्थितांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी प्र-कुलगुरू डी. टी. शिर्के, कुलसचिव विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, शैक्षणिक सल्लागार डी. आर. मोरे, अधिष्ठाता पी. एस. पाटील, भारती पाटील, पी. डी. राऊत, ए. एम. गुरव, इनोव्हेशन व इनक्युबेशन सेंटरचे संचालक आर. के. कामत, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डी. के. गायकवाड, क्रीडा विभागप्रमुख पी. टी. गायकवाड आदी उपस्थित होते.

पुढारी

संक्षिप्त




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'बेटी बचाओ अभियान'अंतर्गत प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित चित्ररथ.**

# विद्यापीठाचा 'बेटी बचाओ अभियान' चित्ररथ

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठात कार्यरत असलेल्या 'बेटी बचाओ अभियान'अंतर्गत प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात चित्ररथ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात विद्यापीठातील १५० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. चित्ररथात बालविवाह पद्धतीवर प्रकाशझोत टाकण्यात आला. संचलनात 'बेटी बचाओ' अभियान घोषवाक्याचे सादरीकरण करण्यात आले. अभियानाच्या दूत तारा खान यांनी नेतृत्व केले. अभियानाच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी आयोजन केले.

पुढारी

# विद्यापीठात उद्या 'विथ लव फ्रॉम रशिया' सांस्कृतिक कार्यक्रम

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ विदेशी भाषा विभाग आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. ३०) सायंकाळी पाच वाजता वि. स. खांडेकर भाषा भवन येथे 'विथ लव फ्रॉम रशिया' हा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमांतर्गत मिनिस्ट्री ऑफ फॉरेन अफेअर्स, मॉस्को, रशियन फेडरेशन यथील शिक्षक चुबारोवा तत्याना, नतालिया बुरत्सेवा, पलीना बुर्दीना, इरिना बिस्पालवा यांच्यासमवेत काही विद्यार्थी विदेशी भाषा विभागास भेट देणार आहेत. विद्यार्थी पारंपरिक रशियन नृत्य सादर करणार आहेत. रशियातील शिक्षक विद्यापीठातील विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून उपस्थित राहण्याचे आवाहन विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.

पुढारी

# विद्यापीठात आजपासून पत्रकारिता विद्यार्थी काँग्रेस

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या वतीने दि. २९ ते ३० जानेवारीदरम्यान विद्यापीठातील निलांबरी हॉल पत्रकारितेच्या राज्यभरातील विद्यार्थ्यांसाठी 'राज्यस्तरीय पत्रकारिता विद्यार्थी काँग्रेस २०१९'चे आयोजन करण्यात आले आहे. 'फेक न्यूज : मिसइन्फर्मेशन अँड डिसइन्फर्मेशन' ही मध्यवर्ती संकल्पना आहे.




पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे यंदा सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. यानिमित्ताने विविध उपक्रम राबविले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय काँग्रेस आयोजित करण्यात आली आहे. दै. 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले, 'आयबीएन लोकमत'चे माजी वृत्त संपादक राजेंद्र हुंजे, माहिती तंत्रज्ञानातील तज्ज्ञ डॉ. राजेंद्र पारिजात, औरंगाबाद येथील 'एमजीएम'च्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या प्रमुख डॉ. रेखा शेळके, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागातील सहायक प्राध्यापक डॉ. सुधीर भटकर, पुणे विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागातील सहायक प्राध्यापक संजय तांबट, शहाजी लॉ कॉलेजमधील सहायक प्रा. डॉ. प्रवीण पाटील, समाज माध्यमतज्ज्ञ विनायक राजाध्यक्ष आदी मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले आहे.